पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय फौंड्री दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठ उद्योग कक्ष व इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फौंड्रीमन कोल्हापूर चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.२२) दुपारी चार वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात उद्योगपती प्रफुल्ल वानखेडे यांचे व्याख्यान आयोजित केले आहे.

'नवी औद्योगिक क्रांती आणि संधी' या विषयावर ते मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के असणार आहेत. डॉ. वानखेडे भारत सरकारच्या बी.आय.ए.एस. समितीच्या अभियांत्रिकी विभागाशी संलग्न तांत्रिक समितीचे सदस्य आहेत. शिक्षक, विद्यार्थी, उद्योजकांचा कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठ उद्योग कक्षाचे समन्वयक डॉ. एस. डी. डेळेकर यांनी केले आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. सोमवारी बॅचलर ऑफ व्होकेशन (नर्सिंग), बॅचलर ऑफ व्होकेशन (कॉम्प्युटर प्रोग्रामिंग), बॅचलर ऑफ व्होकेशन (केमिकल टेक्नॉलॉजी), बॅचलर ऑफ व्होकेशन (न्यूट्रिशन अँड डाएट), बॅचलर ऑफ व्होकेशन (शुगरकेन टेक्नॉलॉजी) आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षेला ७४ विद्यार्थी उपस्थित होते, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुण्यनगरी

# विद्यापीठात आज वानखेडे यांचे व्याख्यान

कोल्हापूर : राष्ट्रीय फौंड्री दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठ उद्योग कक्ष व इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फौंड्री मॅन कोल्हापूर चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रफुल्ल वानखेडे यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. हा कार्यक्रम कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली दि. २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ वाजता विद्यापीठाच्या शाहू सभागृहात होणार आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या उद्योग कक्षाचे समन्वयक डॉ. एस. डी. डेळेकर यांनी दिली.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात चित्रपट निर्मिती अभ्यासक्रम

। कोल्हापूर । शिवाजी विद्यापीठात पदवी पातळीवरील बी.ए. चित्रपट निर्मिती हा अभ्यासक्रम ऑक्टोबर, २०२३ पासून सुरू करण्यात येत आहे. अशा प्रकारचा अभ्यासक्रम सुरू करणारे शिवाजी विद्यापीठ हे राज्यातले पहिलेच विद्यापीठ आहे. कोल्हापूरला चित्रपट निर्मिती परंपरेचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. भारतीय चित्रपटसृष्टीला अनेक कलावंत कोल्हापूर चित्रपट परंपरेने मिळवून दिले आहेत. अभ्यासक्रमात चित्रपट निर्मितीचे पायाभूत स्वरूपाचे ज्ञान विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे.

अभ्यासक्रमाची रचना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार करण्यात आली आहे. चित्रपट निर्मितीच्या विविध क्षेत्रांची या अभ्यासक्रमाद्वारे प्रकारांची प्रात्यक्षिकासह माहिती करून दिली जाणार आहे. चित्रपट इतिहास, चित्रपटांचे सौंदर्यशास्त्र, पटकथा लेखन, दिग्दर्शन व प्रत्यक्ष चित्रपट निर्मिती या व इतर अनेक विषयांचा यात समावेश आहे. या अभ्यासक्रमासाठी तज्ज्ञ प्राध्यापक, नामवंत कलावंत व तंत्रज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

सकाळ

# प्रफुल्ल वानखेडे यांचे आज विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : राष्ट्रीय फौंड्री दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठ उद्योग कक्ष आणि इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फाउंड्री मैन (आयआयएफ) कोल्हापूर चॅप्टरतर्फे लेखक प्रफुल्ल वानखेडे यांचे उद्या, बुधवारी दुपारी ४ वाजता विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात व्याख्यान होणार आहे. 'नवी औद्योगिक क्रांती आणि संधी' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय असून, अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के असणार आहेत. या व्याख्यानासाठी शिक्षक, विद्यार्थी, उद्योजक, नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन विद्यापीठ उद्योग कक्षाचे समन्वयक डॉ. एस. डी. डेळेकर यांनी केले.

तरूण भारत

# विद्यापीठात आज प्रफुल्ल वानखेडे यांचे व्याख्यान

कोल्हापूर : राष्ट्रीय फाउंड्री दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठ उद्योग कक्ष व इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फाउंड्री मैन कोल्हापूर चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यामाने आज (दि. २२) दुपारी ४ वाजता उद्योजक प्रफुल्ल वानखेडे यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. औष्णीक ऊर्जा व इंधनाचे ज्वलनशीलता आणि ऊर्जेचे संरक्षण या क्षेत्रात गेल्या दोन दशकापासून कार्यरत आहेत. ते भारत सरकारच्या बी.आय.ए.एस. समितीच्या अभियांत्रिकी विभागाशी संलग्न तांत्रिक समितीचे सदस्य आहेत. 'नवी औद्योगिक क्रांती आणि संधी' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. विद्यापिठातील शाहू सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आहेत. तरी या व्याख्यानाला शिक्षक, विद्यार्थी, उद्योजकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठ उद्योग कक्षाचे समन्वयक डॉ. एस. डी. डेळेकर यांनी केले आहे.

तरुण भारत

# विद्यापीठात चित्रपट निर्मिती अभ्यासक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात पदवी बी. ए. चित्रपट निर्मिती हा अभ्यासक्रम ऑक्टोबर २०२३ पासून सुरू केला आहे. राज्यात एकमेव शिवाजी विद्यापीठात असा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. चित्रपट निर्मिती परंपरेचा वारसा लाभलेल्या चित्रपट सृष्टीला कोल्हापुरने अनेक कलाकार मिळवून दिले. चित्रपट निर्मितीचे पायाभूत स्वरूपाचे ज्ञान विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे. चित्रपट निर्मितीच्या विविध क्षेत्राची या अभ्यासक्रमाव्दारे विद्यार्थ्यांना माहिती करून दिली जाणार आहे. चित्रपट इतिहास, सौंदर्यशास्त्र, पटकथा लेखन, दिग्दर्शन व प्रत्यक्ष चित्रपट निर्मिती इतर अनेक विषयांचा यात समावेश आहे. तज्ज्ञ प्राध्यापक, कलावंत तंत्रज्ञ या विषयाचे मार्गदर्शन करणार आहेत.